RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



LATUR लातूर  वर्ष ३४ वे  अंक १४३ वा  शनिवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)  पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26  पृष्ठे – ६  मो:९४२२४७२५०२  किंमत १ रुपया

# कोल्हापूरमध्ये दंगल, सध्या तणावपूर्ण शांतता

## रात्रीच्या अंधारात दगडफेक, पेट्रोल बॉम्ब हल्ला, जाळपोळ, गाड्यांची झाली तोडफोड

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** कोल्हापूरमधील सिद्धार्थनगरमध्ये दोन समाजात तेढ निर्माण झाली असून शुक्रवारी रात्री याचे रूपांतर दंगलीत झाले. त्यामुळे दोन गटात तुफान दगडफेक जाळपोळ आणि गाड्यांची तोडफोड झाली. सध्या कोल्हापुरातल्या सिद्धार्थनगर परिसरामध्ये तणावपूर्ण शांतता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सिद्धार्थनगर कमानीजवळ असणाऱ्या चौकात सिद्धार्थनगर आणि राजेबागस्वार येथील दोन गटात गेल्या अनेक दिवसांपासून वाद आहे. राजेबागस्वार फुटबॉल क्लबच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त फलक आणि साऊंड सिस्टिम लावल्यावरून हा वाद सुरू झाला. यामुळे काल दुपारपासूनच या परिसरात तणाव निर्माण झाला होता. या परिसरात वर्चस्व कोणाचे? यावरून गेल्या अनेक दिवसांपासून या तरुणांमध्ये वाद असून, यावरूनच ही घटना घडली असल्याचे सांगितले जाते.

परिसरात शुक्रवारी संध्याकाळी सहा वाजता वाद उफाळून आला. त्यानंतर दोन गटातील नागरिकांनी



एकमेकांवर तुफान दगडफेक करायला सुरुवात केली. तसेच काही तरुणांनी परिसरात उभ्या असलेल्या चारचाकी आणि दुचाकी वाहनांची देखील तोडफोड केली. काहींनी वाहने पेटवून देण्याचा प्रयत्न केला. परिसरात बॅनर लावण्यावरून हा वाद झाला असल्याची माहिती समोर आली आहे. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून ते बॅनर उतरवले आहे. सध्या सिद्धार्थ नगर परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने कोल्हापूर पोलिसांनी मोठ्या प्रमाणात पोलिस कुमक मागवून जमावावर नियंत्रण मिळवले आहे. दोन्ही बाजूने जोरदार घोषणाबाजी होत असल्याने वाद अधिक वाढ होताना दिसत होता. त्यामुळे पोलिसांनी कुमक मागवली आणि जमाव पांगवला. तर काहींना ताब्यात देखील घेतले आहे. फुटबॉल क्लबच्या ३१व्या वर्धापन दिनानिमित्त लावण्यात येणारा फलक आणि साऊंड सिस्टिम मुळेच हा वाद झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांच्या वतीने देण्यात आली.

### कोल्हापूरच्या भूमीचा सन्मान राखा : आमदार रोहित पवार

राजर्षी शाहू महाराजांच्या आणि पुरोगामी विचारांना जन्म देणाऱ्या कोल्हापूरच्या भूमीत दोन गटात वाद, संघर्ष होत असेल हे अत्यंत दुर्दैवी आहे. विचारांसाठी संपूर्ण देशाच्या नजरा या पुरोगामी विचारांच्या कोल्हापूरकडे कायम असतात. कोल्हापूरमध्ये आजपर्यंत कधीही न घडलेल्या अशा घटना अलीकडच्या काळात वारंवार का होतात, याचा बारकाईने विचार करण्याची गरज आहे. माझी कोल्हापूरकरांनाही विनंती आहे की, आपण ज्या भूमीत जन्मलो त्या पवित्र भूमिला, विचारांना कोणतंही गालबोट लागू नये याची दक्षता घेण्याची जबाबदारी आपलीच असल्याने कुणाच्याही चिथावणीला बळी न पडता शांतता राखून कोल्हापूरच्या भूमीचा सन्मान कायम राखावा, असे आवाहन शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे.

# भारत-पाकिस्तान मुद्द्यावर कोणतीही मध्यस्थी स्वीकार्य नाही : परराष्ट्र मंत्री

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत-पाकिस्तान मुद्द्यावर कोणतीही मध्यस्थी स्वीकार्य नाही, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी नाव न घेता ट्रम्प यांना स्पष्टच सांगितले

भारत-पाकिस्तान मुद्द्यावर कोणतीही मध्यस्थी स्वीकार्य नाही, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी नाव न घेता ट्रम्प यांना स्पष्टच सांगितले

भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाच्या मुद्द्यावर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी मोठे विधान केले आहे. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षाच्या मुद्द्यावर आम्हाला कोणत्याही प्रकारची मध्यस्थी मान्य नाही. १९७० पासून पन्नास वर्षे उलटून गेली आहेत आणि ही एक राष्ट्रीय सहमती आहे, असे विधान एस जयशंकर यांनी एका कार्यक्रमात केले. ज्यावेळी व्यापाराचा प्रश्न येतो, जेव्हा शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न येतो, जेव्हा आमच्या धोरणात्मक स्वायत्ततेचा प्रश्न येतो, जेव्हा मध्यस्थीला विरोध येतो तेव्हा हे सरकार अगदी स्पष्ट आहे, असंही एस जयशंकर म्हणाले.

एस जयशंकर म्हणाले की, जर कोणी आमच्याशी असहमत असेल तर कृपया भारतातील लोकांना सांगा की तुम्ही शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यास तयार नाही. तुम्हाला धोरणात्मक स्वायत्ततेची किंमत नाही. आम्हाला ते आवडते. ती



राखण्यासाठी आम्हाला जे काही करावे लागेल ते आम्ही करू.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा भारत-पाकिस्तानमधील युद्धविराम केल्याचा दावा केला. भारताने ट्रम्प यांनी युद्धविराम केल्याचा दावा खोडून काढला आहे, पाकिस्तानच्या मुद्द्यावर कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी मान्य नाही, असंही एस जयशंकर म्हणाले.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान, भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या आत १०० किमी आत घुसून ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारताच्या क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानचे अनेक हवाई तळ उद्ध्वस्त केले.

# आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस शासनाशी भिडणार : साळुंके

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात कंत्राटी तत्वावर काम करणारे सुमारे ९५० अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून आपल्या विविध मागण्यांकरिता संविधानिक मार्गाने बेमुदत आंदोलन पुकारलेले आहे. या आंदोलानाचा आज चौथा दिवस असून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंके यांनी जिल्हा परिषदेच्या आवारातील आंदोलनस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन आपल्या पक्षाचा सदर आंदोलनास जाहीर पाठींबा असल्याचे नमूद केले.

यावेळी, कर्मचार्यांच्या मागण्या जाणून घेऊन त्या अनुषंगाने जिल्हा काँग्रेस पक्ष न्याय व हक्कासाठी आपल्या सोबत असून, राज्य पातळीवर देखील पक्षाचा



या आंदोलनास पाठींब्यासाठी पुढाकार घेऊन राज्य शासनास या आंदोलनाची दखल घेण्यास भाग पाडू तसेच जर या आंदोलकांच्या रास्त मागण्याची दखल शासनाने त्वरित न घेतल्यास, प्रसंगी काँग्रेस पक्ष शासनास संविधानीक मार्गाने भिडण्याची भूमिका घेईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, एकत्रीकरण समिती मार्फत त्यांना आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हास्तरीय एकत्रीकरण समितीचे हेमंत सोळुंखे, अबरार मोहसीन, गिरीश कुलकर्णी, डॉ. अशुकेत वैरागे, डवरी संगीता, आनंद दिवे, संदिप त्रिकोळीकर, ओमप्रकाश सोनवणे, पांडुरंग मुळे, पूजा पाटील, बालिका बिराजदार व जिल्ह्यातील इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि.१४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करणे, वेतन वाढ, बोनस, विमा धोरण, बदली धोरण, झचचतध कर्मचार्यांचे छक्क् मध्ये समायोजन आणि प्रलंबित मानधन इत्यादी मागण्यांसाठी राज्यभरात बेमुदत कामबंद आंदोलन सुरु असून त्याचाच भाग म्हणून लातूर जिल्हा परिषदेच्या आवारात दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून आरोग्य विभागातील कंत्राटी अधिकारी व कर्मचारी आंदोलनात सहभागी झालेले आहेत. आंदोलनाचा आज चौथा दिवस असून जिल्ह्यातील आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याने शासनाने तात्काळ या आंदोलनाची दखल घेण्याची आंदोलकांनी मागणी केली आहे.

# विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा कारखान्याकडून मांजरा धरणाचे जलपुजन

**लातूर/प्रतिनिधी :** गुरूवार दि. २१ ऑगस्ट रोजी मांजरा परिवाराचे कुटुंबप्रमुख व मार्गदर्शक माजी मंत्री आदरणीय सहकार महर्षी श्री दिलीपराव दगडोजीराव देशमुख साहेब यांच्या सूचनेनुसार, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने धनेगाव मांजरा धरण येथे पाण्याचे जलपूजन व्हाइस चेअरमन श्री अशोक आप्पा काळे व संचालकांच्या हस्ते करण्यात आले.

लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी उभारलेले बॅरेजस मुळे शेतक-यांच्या जिवनात आमुलाग्र बदल घडून आला आहे. शेतीला पाणी आवश्यकतेनुसार मिळत असल्याने ऊस व अन्य पिकांच्या माध्यमातून आर्थिक परिवर्तन आपल्या भागात घडून आले आहे. मांजरा परिवाराचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी साखर कारखानदारीला योग्य दिशा व मार्गदर्शन करत असल्याने व माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख, माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने साखर उद्योगात होत असलेले कार्य देशभरात गौरवले जात आहे.

मुबलक पाणी, वेळेवर ऊसाचे गाळप व गरजेनुसार तत्परतेने कर्ज मिळत असल्याने सहकार क्षेत्र मजबूत स्थितीत आहे. सिंचनाची व्यवस्था



सक्षम असल्याने हे सर्व आर्थिक परिवर्तन होत आहे यामुळेच कृतज्ञता व्यक्त करत मांजरा कारखान्याकडून मांजरा धरण येथे जलपुजन करण्यात आले.

यावेळी संचालक तथा शेतकी कमिटीचे चेअरमन श्री कैलास पाटील, संचालक तात्यासाहेब देशमुख, सदाशिव कदम, दयानंद बिडवे, सचिन शिंदे,श्रीकृष्ण काळे ,अनिल दरकसे,बाळासाहेब पांढरे, वसंत उपाडे , मदन भिसे,श्री. ज्ञानेश्वर पवार,निळकंठ बचाटे, शंकर बोळंगे, अरुण कापरे, एस आर पाटील, उपस्थित होते.

## कुजबुज
-डॉ. संजय जमदाडे



**बाप्पा पावला! गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांना टोल माफी...**

## चिमटा दयाचा



मनपा, सिंगल युज प्लॉस्टीक बंदी असताना बाळगण्यावर कारवाई करीत आहे ! अशीच कारवाई सतत चालू ठेवण्याची गरज आहे !!

# घरफोडी व कारखान्यातील चोरी गुन्ह्यातील आरोपीला अटक

## १५ लाख ८२ हजार रुपयाच्या मुद्देमाल जप्त, १८ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** घरफोडी व खारखान्यातील चोरी प्रकरणी थोडक्यात माहिती की, काही दिवसा पासून जिल्ह्यात रात्रीच्या चोरीच्या घटना घडल्या होत्या. तसेच विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर चोरी, साखर कारखान्यातील गनमेटलच्या वस्तू अशा चोरीच्याही घटना घडल्या होत्या. त्यावरून विविध पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात गुन्हेगारा विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शेतकऱ्याच्या माला विरूद्ध होणारे गुन्हे कारखान्यातील चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याकरिता आदेशित केले होते. पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे दोन पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना पथकाला रात्रीच्या वेळी चोरी





करणाऱ्या, तसेच जनावर व साखर कारखान्यातील गनमेटल च्या वस्तू चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक २१ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता पथकांनी मुरुड येथील बायपास रस्त्यावरील रेल्वे स्टेशन चौक परिसरात सापळा लावून दोन संशयितांना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव १) रमेश वय २६ वर्ष, राहणार राजेश नगर ढोकी, जि. धाराशिव. २) शिवाजी वय ४५ वर्ष, राहणार वाटवडा ता.जि.धाराशिव सध्या राहणार राजेश नगर ढोकी, जि.धाराशिव . असे असल्याचे सांगितले. त्याच्या कडे असलेल्या बॅगची तपासणी केली असता सदर बॅगमध्ये ०९ लाख २५ हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. सदर रकमेबाबत विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या इतर साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी घरातघुसून चोरी केली असून अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून शेळ्या, म्हैस तसेच साखर कारखान्यातील गन मेटल च्या वस्तू चोरल्याचे कबूल केले. व सदरची रक्कम ही विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर व सोन्या-चांदीचे दागिने चोरून ते विकून त्यामधून मिळवलेली असल्याचे कबूल केले.

तसेच पोलीस ठाणे किल्लारी, भादा व नांदेड जिल्ह्यातील बारड येथील साखर कारखान्यामधील गन मेटल च्या वस्तू त्यांच्या अन्य साथीदारासह मिळून चोरी करून ते भंगार दुकानदार ३) मुक्तार वय ४२ वर्ष, राहणार तुकाई नगर, मुरुड. याला तसेच आणखीन एक बार्शी येथील भंगार खरेदी दुकानदाराला विक्री केल्याचे सांगितले आहे. त्यावरून वर नमूद मुरुड येथील दुकानदारा कडून ०१ टन ०७ किलोग्रॅम इतक्या वजनाचे अंदाजे ०६ लाख ५७ हजार ४५६ रुपये किमतीचे भंगार जप्त करण्यात आले आहे. तसेच लातूर जिल्ह्यातील घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याच्या अभिलेखाचे पाहणी केली असता पोलीस ठाणे भादा हद्दीतील घरफोडी,जनावर चोरी, तसेच साखर कारखान्याच्या गन मेटल च्या वस्तू चोरीचे असे ०३ गुन्हे, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, कासारशिरशी येथील प्रत्येकी ०३ गुन्हे, पोलीस ठाणे चाकूर व देवणी येथील प्रत्येकी ०२ गुन्हे तर पोलीस ठाणे अहमदपूर, उदगीर शहर, निलंगा, किल्लारी व नांदेड जिल्ह्यातील बारड पोलीस ठाण्यातील प्रत्येकी ०१ असे एकूण १८ गुन्हे उघडकीस आले असून नमूदाकडून एकूण १५ लाख ८२ हजार ४५६ रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमूदांकडून त्यांच्या अन्य १२ साथीदारासह वर नमूद पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये चोरी करून त्यात चोरलेला मुद्देमाल विकून मिळवलेली त्यांच्या हिश्याला आलेली नमूद रक्कम जप्त करण्यात आली आहे.

नमूद गुन्हेगार हे धाराशिव जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे किल्लारी यांच्या ताब्यात देण्यात आले असून ते सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. त्याच्याकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून त्याच्या सोबतच्या साथीदारांचा तसेच भंगार खरेदी करणाऱ्यांचा दुकानदाराचा शोध पोलिस पथक घेत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, राजेश कंचे,प्रदीप स्वामी, तुराब पठाण, गणेश साठे, मोहन सुरवसे, रियाज सौदागर, युवराज गिरी, अर्जुनसिंग राजपूत, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, महादेव शिंदे, गोविंद भोसले, शैलेश सुळे, हरी पतंगे,व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे, महिला पोलीस अमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सणाचे आकर्षन कमी होत आहे

भारतीयाकडे एवढे सण जगात कोठे नसतील. एवढे सण भारतात विविध प्रांतात विविध सण साजरे केले जातात. एक परंपरा भारतीयात आहे. त्यामुळे मोठ्या आंनदाने सण साजरा करतात. विशेष बाब म्हणजे सण एकटे सण साजरे करीत नाहीत तर सर्वांना बरोबर सह कुटुंबिय साजरे करतात. त्यामुळे एक प्रकारचा वेगळाच आनंद मिळतो. मुळात सण काही तरी सांगतात. सणाचे महत्व हिंदुधर्मात वेगळे आहे. याला विज्ञान जोडले आहे. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. केवळ अध्यात्मिक नाही तर विज्ञानाची साथ घेऊन सण-उत्सव साजरे केले जातात. त्यामुळे भारतीय सणाचे महत्व ओळखले पाहिजे. जाणून घेतले पाहिजे. त्याच प्रमाणे आपल्याकडे एकादशीची प्रथा आहे. एक दिवस काही न खाणे असा उपवास केला जातो. अशा उपवासाचा लाभ आरोग्यास होतो. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. मुळात काही बाबीचा विचार करीत नाहीत. पारंपारिकपने चालत आल्या आहेत तशाच चालू ठेवल्या आहोत. नऊ दिवसाचे उपास कसे करावे याची माहिती दिली जाते. आता बैलपोल साजरा केला गेला व कशाप्रकारे साजरा केला पाहिजे. याचे ज्ञान घेत नाही. मुळात भारत हा देश कृषी प्रधान आहे. मुख्य व्यवसाय शेती आहे. अशा शेतीप्रधान देशात बैलाचे महत्व आहे. शेती म्हटले की, जनावरे आले. जनावरास धुणे, रंगविणे, गुळवणी पाजणे, एक दिवस कामाला जुंपले जात नाही. अशा स्थितीत जनावरांची जोपासणा करणारा भारतीय शेतकरी आहे. जनावरे नष्ट करणारे दुसरेच असल्याने जनावरे नष्ट केली जात आहेत. ब्रिटीश काळापेक्षा पाच पट कत्तलखाने वाढली आहेत. जनावरे शेतीसाठी अतिषश महत्वाची आहेत. दुधाचा धंदा शेतकरी करतात. गायीचे दुध व तुप याला चांगली किंमत येते. म्हैसची दुधाची मागणी मोठी आहे. वास्तविक जेवढी दुधाची मागणी तेवढे दुधासाठी जनावरे आहेत का? हा संशोधनाचा विषय होवू शकेल. बनावट व भेसळ दुधाचे उत्पादन होते. विषारी दुध असेल तर जीवनावर मोठा परिणाम होतो. हे सांगणे नको. मात्र सध्याला दुधाची मागणी व येणारी किंमत मोठी आहे. तरी अविचारी मंडळी गोधन विकतात हे पाप कर्म थांबले पाहिजे. प्रत्येक सणाचे महत्व भिन्न आहे. एक चांगला व सुसंस्कारीत विचार आहे. भारतीय सण-उत्सव विनाकारण साजरे केले जात नाहीत ही बाब लक्षात घेतली पाहिजे. काही तरी मर्म यामागे लपले आहे. त्यामुळे सण-उत्सव हे साजरे केले पाहिजेत. आपल्या कुटुंबियासमावेत केले पाहिजेत. आलिकडे सणाचा उत्साह काही प्रमाणात दिसून येत आहे. पुर्वी व आता फरक आहे. पुर्वी सणावारास चपाती, भात, गोडधोड मिळत होते. आता दररोजच चपाती, भात, गोड ताटात असते. त्यामुळे खाण्याबाबत महत्व राहीले नाही. दररोजच चांगेल अन्न खातो आहे. खाण्यामागील भाग सोडला तर बाकी इतर महत्व दुरावले आहेत. बैलाचा पोळा साजरा करताना बैलच राहीले नाहीत तर सण कसे? असा विचार समोर येतो. मुळात गाय व बैलाचा ऱ्हास होत असल्याने आज शेतकऱ्याची स्थिती समाधान कारक नाही. आज अत्याधुनिक पद्धतीने शेती परवडत नाही. इंधन लागते. एक ट्रॅक्टर किती किंमतीचे आहे. गाय असेल तर बैल मिळतात. चांगले दही, ताक, दुध व तुप मिळते. शेणखत मिळतो जो शेतीसाठी योग्य आहे. शेतीत रासायनिक खताचा वापर होत असल्याने विविध रोग होत आहेत. अन्न हे जैविक न मिळता ते रासायनिक पोटात जात आहे. मधुमेह, कॅन्सर आदि रोगाचे प्रमाण वाढले आहे. पुर्वी खाण्याचे तेल घाण्यावर काढून शुद्ध असत. आता शुद्धताच पळाली जाते का? सर्व काही आरोग्यास घातक खात आहोत. सणाच्यावेळी आलिकडे बदलते स्वरूप बाहेरून हॉटेल किंवा स्विटमार्टमधुन पदार्थ आणले जातात. घरी शुद्ध व स्वच्छ करण्याकडे महिलांनी पाठ फिरवली आहे हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे सण साजरे करताना घरीच अनेक पदार्थ केले पाहिजेत. याकडे ओढ असली पाहिजे. त्याशिवाय आरोग्य ठिक राहणार नाही. महिण्याची एकादस का करावी. किंवा अन्य उपवास का करावेत याचा विचार केला पाहिजे. आपले पुर्वज हुशार होते त्यांनी आगामी हजारोवर्षाचा विचार करून काही नियम बनविले आहेत. ते वेडे नव्हते. चाफेकर बंधुनी विमानाचा शोध लावला राईट बंधुंनी नाही. आज अणुबॉम्ब म्हणतात याचा उपयोग आपल्या पुर्वजांनी रामायण व महाभारतात उपयोग केला आहे. भारतीय मोठे हुशार होते व आहेत. आज व्यसनामुळे बिघडत चाललेली पिढी आहे. व्यसनी करावयाचे आपणच व व्यसनमुक्ती चालवायाची आपणच हा वेडापना आहे का? शहानेपना आहे हेच कधी कळून येत नाही. जे वाईट आहे त्याला रोखले जात नाही. दारू पिऊन लिव्हर जाते हे सर्वांना माहिती आहे मात्र दारूस विरोध केला जात नाही. हे वाईट आहे का नाही? त्यामुळे विचार केला पाहिजे. आपल्या पुर्वजांनी सण-उत्सव साजरे करण्याची प्रथा विनाकारण सुरु केली नाही. काही तरी तथ्य आहे, विज्ञान सामावले आहे. डार्विनचा सिद्धांत चुकीचा आहे. आपले ऋषीमुनी हे वैज्ञानिक होते. यांनी अनेक शोध लावले त्यांची प्रसिद्धी नाही, अनेक ऋणीचा इतिहास जाणून घ्यावा. गणित असो अन्य शास्त्रार्थ असो यात भारतीय प्रविण होते. त्यामुळे भारतातील प्रत्येक बाब ही विचारपुर्वक समजली पाहिजे. जगाला अन्नधान्य पुरविणारी क्षमता भारतीयात आहे. मात्र कृषी प्रधान देशातच शेतकरी हा पोशिंदा आहे त्याच्याकडे लक्ष दिले जाते. तोच जीवन संपवित आहे. त्यामुळे जनावरे कसे जोपासणार! एक बाब लक्षात ठेवावी, सर्व भारतीयांनी आपआपले हिंदु रितीरिवाजाप्रमाणे सण-उत्सव साजरे करावेत. एकत्र सर्व कुटुंबियातील व्यक्ती सणाच्या वेळी पाहिजे. सणाचा क्रम हा एक वर्षाचा आहे. दररोज नाही. आज पोळा असो किंवा गणपती उत्सव असो वर्षाला ३६५ दिवसांनी येतात. त्यामुळे सण-उत्सवात आलेली मरगळ, अनुत्साह बाजूला सारून आनंदाने साजरे केले पाहिजेत. सर्वांचा सहभाग हा स्वर्गातील आंनदाहुन वेगळा आहे. स्वर्ग हा भुतलावर आहे केवळ आपणास आनंद घेता येत नाही हे मोठे दुर्दैव आहे.

# सरकार साखर उद्योगाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे : सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**पुणे/प्रतिनिधी** : सरकार साखर उद्योगाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी पुणे येथे केले.

पुणे येथे वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोसिएशन, पुणे आयोजित साखर जैवऊर्जा उद्योगाच्या नवीन क्षितिजावरील तांत्रिक चर्चासत्रास सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष बी.बी ठोंबरे, महासचिव डॉ.पांडुरंग राऊत, डीएसटीए अध्यक्ष शहाजीराव भड, साखर आयुक्त सालीमठ, यशदा पुणे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे, कृषी शास्त्रज्ञ डॉ.बाळकृष्ण जगदगनी, जैव ऊर्जा तज्ञ डॉ.संजय पाटील तसेच खाजगी आणि सहकारी कारखान्याचे चेअरमन, एमडी व अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की,महाराष्ट्रातील साखर उद्योग देशातील एक क्रमांकाचा उद्योग असून ग्रामीण अर्थकारणाचा कणा आहे. १९९८ नंतरच्या साखर उद्योगाचे विनियंत्रणानंतर गेल्या २५ वर्षात महाराष्ट्रामध्ये खाजगी क्षेत्रामधील साखर कारखान्याची संख्या प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली. आज जवळपास १३३ साखर कारखाने खाजगी क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत व महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादनाच्या ५० टक्के साखर उत्पादन, ७० टक्के इथेनॉल उत्पादन व ६० टक्के कोजन पावर यांचे उत्पादन या खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांकडून होते.

वास्तविक पाहता खाजगी क्षेत्रातील साखर कारखानेसुद्धा १०० टक्के शेतकऱ्यांच्या मालकीचे आहेत. अनेक कारखान्यांमध्ये दहा ते पंधरा हजार ऊस उत्पादक शेतकरी त्या कारखान्याचे सभासद आहेत व हा उद्योग संपूर्णपणे शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून अत्यंत व्यावसायिक व आर्थिक शिस्तीचे पालन करून चालवला जातो. त्यामुळेच अवघ्या २५ वर्षात महाराष्ट्रातील खाजगी साखर कारखान्यांची संख्या जवळपास सहकारी साखर कारखान्यांपेक्षा जास्त झालेली आहे. सध्या साखर उद्योग आर्थिकदृष्ट्या काहीअंशी संकटामध्ये असला, तरी या उद्योगाला अत्यंत चांगले व उज्वल भविष्य आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे साखर उद्योगाचे परिवर्तन आता ऊर्जा उद्योगांमध्ये व ते ही नवीकरणीय ऊर्जा म्हणजेच रिनेबेल एनर्जी मध्ये होत आहे.

उसाच्या भुशापासून वीज निर्मिती, मोलासेस पासून इथेनॉल निर्मिती, इथेनॉल पासून विमानाचे इंधन व कारखान्यातील सांडपाण्यापासून व प्रेसमड पासून बायोगॅस व त्यापासून बायो सीएनजी आणि ग्रीन हायड्रोजन यासह जगाचे भविष्यातील इंधन असणारे सगळे इंधनाचे सोर्स या साखर उद्योगांमधून निर्माण होणार आहेत. म्हणून या उद्योगाला अत्यंत उज्वल भविष्य आहे. सध्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या स्तरावरील या उद्योगास प्राधान्य दिलेले असल्याने व उद्योगाच्या सर्व अडी-अडचणी वेळोवळी सोडवण्याचा शासन तत्परतेने प्रयत्न करत आहे. त्याचाच भाग म्हणून परवाच राज्य शासनाने धानापासून इथेनॉल बनवण्याचे धोरण सर्व साखर कारखान्याच्या डीसलेरीना लागू केलेले आहे.

त्याचबरोबर इतर उपपदार्थ प्रामुख्याने बायो सीएनजी ग्रीन हायड्रोजन यासारख्या अत्याधुनिक




पुर्ननिर्मित ऊर्जाची संसाधने मोठ्या प्रमाणामध्ये महाराष्ट्रामध्ये निर्माण व्हावीत म्हणून राज्य सरकार लवकरच बायो सीएनजी चे धोरण जाहीर करणार आहे. यापूर्वीच राज्य सरकारने ग्रीन हायड्रोजनचे धोरण जाहीर करून भरीव अनुदान व प्रोत्साहनात्मक योजना लागू केलेल्या आहेत. याबद्दल मी आपणास आश्वासित करतो की, साखर उद्योगाच्या माध्यमातून आमचे सरकार शेतकरी कल्याणाचे धोरण काटेकोरपणे राबवण्याच्या दृष्टीने प्राधान्य देण्यात येते.

सहकार विभागामार्फत शेतकरी हिताच्या नवनवीन योजना अत्यंत कटाक्षाने राबवण्याचे माझे प्रयत्न राहिलेले आहेत. तसेच, आमच्या सरकारचा विकासाचा केंद्रबिंदू हा शेतकरी व ग्रामीण जनता असल्याने सारखच खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थक्रांतीची ताकद ही फक्त आणि फक्त साखर उद्योगांमध्येच असल्याने त्यासाठी सरकार सातत्याने साखर उद्योगाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, यात मुळीच शंका नाही असे ना. पाटील म्हणाले.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी** : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.


शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फ ेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# आदर्श शिक्षक, बहुआयामी कलावंत जाधव गुरुजींचे निधन

**लातूर/प्रतिनिधी** : : विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणारे, आदर्श शिक्षक, उत्कृष्ट रंगकर्मी, नाट्यरसिक कलावंत व अभिरुची संपन्न चित्रकार श्री श्री मा. जाधव गुरुजी यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे शिक्षण, कला व संस्कृती क्षेत्रातील मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जाधव गुरुजी हे आंतरराष्ट्रीय तबला वादक श्री मुकेश जाधव, औसा येथील प्रा. राजेश जाधव व कॉन्ट्रॅक्टर श्री उमेश जाधव यांचे वडील होत. त्यांच्या मूळ गावी कासार शिरशी (ता. निलंगा) येथील तसेच त्यांनी नोकरी केलेल्या प्रत्येक शाळेत व गावात त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला.

गुरुजींनी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मोजे जांभळवाडी येथे शिक्षक म्हणून पहिली नेमणूक स्वीकारली. त्यानंतर शिवपूर,



औसा तांडा आदी ठिकाणी त्यांनी नोकरी करताना शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी बजावली. शिवपूर येथे नोकरीदरम्यान त्यांच्या मार्गदर्शनाखालील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले होते.

गुरुजींच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशप्रेम व सामाजिक भान रुजले. ते फक्त शिक्षक नव्हते तर नाट्य चळवळीचे प्रणेते होते. त्यांनी 'वीर हनुमान नाट्य मंडळ' स्थापन करून जुलूम, इर्षा, माझं कुंकू, नशीब आदी कौटुंबिक व सामाजिक आशय असलेली नाटके बसवली. गावोगावी झालेल्या या प्रयोगांमुळे समाजप्रबोधनाचे कार्य घडले.

१९७२ च्या भीषण दुष्काळात गुरुजींनी ग्रामस्थांना स्थलांतर थांबवण्यास प्रवृत्त केले. त्यांच्या समुपदेशनामुळे अनेक मुलांचे शिक्षण सुरू राहिले व पुढे त्यांना नोकऱ्या व व्यवसाय मिळाले.

संगीतप्रेमी जाधव गुरुजींनी आपल्या मुलाला मुकेश जाधव यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील तबलावादक म्हणून घडवले. कठोर परिश्रम, सातत्य व चिकाटीने घडवलेली ही प्रतिभा आज जागतिक पातळीवर दखल घेतली जाते.

त्यांच्या निधनामुळे एक उत्कृष्ट शिक्षक, कलाकार, गायक, वादक, रंगकर्मी व समाजप्रबोधक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

### विघ्नहर्त्याचा उत्सव अधिकृत वीजजोडणी घेवूनच निर्विघ्नपणे पार पाडावा- महावितरणचे आवाहन



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

धाराशिव: गणेशोत्सव व त्यापाठोपाठ येणाऱ्या नवरात्र उत्सवासाठी महावितरणकडून तात्पुरती वीजजोडणी देण्यात येत आहे. तसेच या तात्पुरत्या जोडणीच्या वीजवापरासाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घेवूनच विघ्नहर्त्याचा उत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या अखत्यारीतील सर्व धर्मीयांच्या सार्वजनिक उत्सवांना तात्पुरत्या वीजजोडणीसाठी घरगुती वीजुरवठयाच्या वीज दरानेच वीजदर निश्चित केले आहेत. त्यामुळे अनधिकृत वीज जोडणी टाळून गणेश उत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा करिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा. गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा जोड द्यायचा असल्यास योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावल्याची खात्री करून घ्यावी.

गणेशोत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे अत्यावश्यक आहे. काही कारणास्तव वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीजप्रवाह लघुदाब वीजवाहिनीमध्ये प्रवाहित होतो व त्यातून जीवघेण्या अपघाताची शक्यता निर्माण होते. मंडपातील वीजयंत्रणेसह सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या लाईटिंगचे वायर्स खाली झुकलेले नाही किंवा विस्कळीत झालेले नाहीत याची दैनंदिन तपासणी करावी.

गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्कीट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# सावित्रीबाईंचे स्वप्न पूर्ण करणारी अमिषा; मजुरी करणाऱ्या आई-वडिलांची मुलगी झाली डॉक्टर!

**नागपूर/प्रतिनिधी** :''मुलगी शिकली तर प्रगती होईल'' सावित्रीबाई फुले यांचा विचार आजही ग्रामीण भागात नवा उत्साह देतो. त्याच विचाराचं जिवंत उदाहरण म्हणजे नागपूर जिल्ह्यातील निमखेडा गावची अमिषा.

आई-वडील मजुरी करून कसाबसा संसार चालवत होते. दोन वेळचं पोटभर जेवण मिळणंही कधी कठीण जायचं. पण त्यांच्या मुलीने डॉक्टर व्हावं, हा छोटासा स्वप्नगंध आईच्या डोळ्यांत कायम होता. अमिषाने शिक्षणाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निमखेडा येथून केली. लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या अमिषाने पुढे गावातीलच साईबाबा विद्यालयातून दहावीपर्यंत शिक्षण घेतलं आणि दहावीच्या परीक्षेत तब्बल ८४ टक्के गुण मिळवले. तेव्हा सगळ्यांना वाटलं मुलगी नर्सिंगकडे वळेल. पण तिच्या मोठ्या बहिणीने आणि मेव्हण्याने तिच्या डोळ्यांत डॉक्टर होण्याचं स्वप्न जागवलं. त्यांनी ठाम सांगितलं ''तुझ्यात ताकद आहे, तू डॉक्टर नक्की होऊ शकतेस.''

दहावीच्या परीक्षेनंतर कोरोनाचा काळ आला. बहिणीचा नवरा सरकारी नोकरीत असल्यामुळे सोलापूरला बदली झाली आणि अमिषाही तिच्याकडेच राहायला गेली. तिथल्या संगमेश्वर महाविद्यालयात बारावीत प्रवेश घेतला. अपार मेहनतीनं तिने बारावीत ७६ टक्के गुण मिळवले.

यानंतर NEET परीक्षेची तयारी सुरू झाली. पण पहिल्याच प्रयत्नात अपयश आलं. क्षणभर मन खचलं. काही नातेवाईक आणि लोकांनी टोमणे मारले ''हे आपल्याला नाही जमत, .B.Sc कर आणि आई-बाबांना कामात मदत कर, गरीब घरचं मूल डॉक्टर होऊ शकत नाही.''

पण बहिणीच्या आधाराने अमिषा पुन्हा उभी राहिली. तिने ठामपणे ठरवलं ''मी मागे हटणार नाही, डॉक्टर होणं हेच माझं ध्येय आहे.''

दरम्यान मेव्हण्याची बदली पुन्हा नागपूरला झाली. तिथे राहून अमिषा पुन्हा अभ्यासात झोकून दिली. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करणारी तिची जिद्द



पाहून शिक्षकांनीही तिला पाठींबा दिला.

आणि अखेर २०२५ मध्ये तिचं स्वप्न फळाला आलं! अमिषाचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात साठी प्रवेश झाला.

आज तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आहेत. मजुरी करणारे ते हात अभिमानाने म्हणतात ''आता आपली मुलगी पांढऱ्या कोटात लोकांची सेवा करणार!''

अमिषाची कहाणी म्हणजे केवळ एका मुलीचं यश नाही. ती सावित्रीबाईंच्या विचारांची पुष्टी आहे. शिक्षण, मेहनत आणि जिद्द असेल तर छोट्या खेड्यातील मुलगीही मोठी स्वप्नं पूर्ण करू शकते, हे अमिषाने आपल्या जिद्दीने जगाला दाखवून दिलं आहे.

# राजकारणातील संशयास्पद हेतु

राजकारण भ्रष्टाचार व गुन्हेगारीपासून मुक्त असावे हे तत्त्व नि:संशय योग्य आहे; पण त्यासाठी देशात पुरेसे कायदे आहेत. राज्ये व केंद्रशासित प्रदेशांत हस्तक्षेप करण्याचे अधिकार केंद्राला देण्याचा मनसुबा या विधेयकांमागे दिसतो.

गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत तीन विधेयके मांडली. त्यापैकी १३० वे घटना दुरुस्ती विधेयक वादग्रस्त ठरले, त्यावरून सभागृहात गोंधळ झाला. अखेर ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले गेले. ज्या गुन्ह्यासाठी पाच वर्षे शिक्षेची तरतूद आहे, अशा गुन्ह्यांखाली जर सलग तीस दिवस पोलिस कोठडीत पाठवले गेले, तर पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री व मंत्री यांना पदावरून हटवण्याची तरतूद या विधेयकात आहे. तुरुंगातून कोणी सरकारचा कारभार चालवू शकणार नाही, असे शहा म्हणाले. वरवर पाहता हे विधेयक चांगले वाटते. त्याचे तपशील प्रसिद्ध झाल्यावर त्याचे गुण-दोष पुढे येतील; मात्र या विधेयकाद्वारे केंद्र सरकारच्या हाती अधिक सत्ता देण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत आहे. संघ राज्याच्या संकल्पनेच्या ते विरोधात आहे, हा विरोधी राजकीय हेतूने प्रेरित आहे हे जाणवते.

डॉ.मनमोहन सिंग यांच्या सरकारवर भाजपने अनेक आरोप केले व ते भ्रष्ट सरकार असल्याचे चित्र उभे केले. त्यामुळे व राम मंदिरामुळे भाजपला सत्ता मिळाली; पण २-जी स्पेक्ट्रम वाटप असो वा अन्य प्रकरणे असोत; त्यांच्या चौकशीतून कोणताही आरोप सिद्ध झाला नाही. तेव्हा हे नवे विधेयक नसताना त्याही काळात द्रमुकच्या नेत्यांना तुरुंगवास घडला होता. मंत्री किंवा मुख्यमंत्री यांच्यावरही खटला दाखल करता येतो व त्यात दोषी सिद्ध झाल्यास त्यांना पद गमवावे लागते हे महाराष्ट्राने अ.र. अंतुले यांच्या काळात पाहिले आहे. अलीकडे लालू प्रसाद यादव व झारखंडचे हेमंत सोरेन यांनाही मुख्यमंत्री पदे गमवावी लागली होती. म्हणजेच १९५१ चा लोक प्रतिनिधी कायदा पुरेसा आहे. मग नव्या विधेयकांची गरज काय आहे? बिहारसह अन्य राज्यांत आगामी काळात विधानसभा निवडणुका होत आहेत. तेथे जर विरोधी पक्षांची सरकारे आली, तर त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करून त्यांना ३० दिवस कोठडीत डांबून त्यांना पदावरून दूर करणे मोदी सरकारला सोपे जाईल. कारण केंद्रीय तपास यंत्रणा याच सरकारच्या हातात व त्यांच्या मर्जीनुसार वागत आहेत.

पक्षांचा आरोप दुर्लक्ष करण्याजोगा नाही. घटनेने संसद आणि विधिमंडळ म्हणजेच कार्यकारी संस्था आणि न्याय संस्था या दोन स्वतंत्र संस्था ठरवल्या आहेत. कार्यकारी संस्थेवर अंकुश ठेवणे ही जनतेची जशी जबाबदारी आहे तशीच न्याय संस्थेचीही आहे. या विधेयकाद्वारे न्याय संस्थेला डावलण्याचा सरकारचा मनोदय व्यक्त होतो. विधेयक मांडताना शहा यांनी भाजपच्या प्रथेप्रमाणे माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर टीका करण्याची संधी साधली.

**कायदेशीर प्रक्रियेचे काय?**

ज्या व्यक्तीवर गुन्हा सिद्ध झालेला नाही अशा व्यक्तीस ३० दिवस कोठडीत जावे लागले तर त्याला 'आपोआप' पदावरून दूर करण्याची तरतूद जास्त अस्वस्थ करणारी आहे. जर 'गुन्हा सिद्ध झाला' आणि दोन वर्षांची शिक्षा झाली 'तरच' ती व्यक्ती 'अपात्र ठरते' असे सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये एका प्रकरणात स्पष्ट केले होते. आमदार, खासदार अपात्र ठरल्यास त्याचे मंत्रिपद जाणे स्वाभाविक आहे; मात्र येथे कायदेशीर प्रक्रिया पाळणे व ती पूर्ण होणे अपेक्षित आहे. नव्या विधेयकात त्या प्रक्रियेकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले दिसते. गुन्हा सिद्ध होईपर्यंत ती व्यक्ती निर्दोष आहे असे कायदा मानतो. ही प्रथा जगभर पाळली जाते. नवे विधेयक या प्रथेला व कायदेशीर प्रक्रियेला वळसा घालणारे आणि केंद्राच्या हाती अनियंत्रित सत्ता देणारे आहे. राजकारण गुन्हेगारीपासून मुक्त असावे हे सर्वांचे मत आहे; पण त्याला हे विधेयक उत्तर ठरत नाही. हे तुरुंगातून सरकार चालवणे, हा उल्लेख अरविंद केजरीवाल यांच्या रोखाने आहे हे लगेच कळते. गुजरातेत दंगल झाली तेव्हा नरेंद्र मोदी मुख्यमंत्री होते. त्यांनी स्वत:ची अटक चतुराईने टाळली, तेव्हा केंद्रात वाजपेयी यांचे सरकार होते. आताही भाजपच्या लोकसभेतील सदस्यांपैकी ९४ जणांविरुद्ध गंभीर गुन्हेगारी आरोप आहेतच, त्याचे काय? कोठडीतून बाहेर आल्यावर पुन्हा पंतप्रधान किंवा मंत्रिपद 'बहाल' करण्याची तरतूदही या विधेयकात आहे. त्यामुळेच या विधेयकांचा हेतु संशयास्पद वाटत आहे.

# पोट साफ होत नसेल तर सकाळी करा हा उपाय...



मुंबई: आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत बद्धकोष्ठता ही एक सामान्य समस्या बनली आहे. चुकीचा आहार, अपुरी झोप आणि बैठी जीवनशैली यामुळे अनेक लोक या समस्येने त्रस्त आहेत. सकाळी पोट व्यवस्थित साफ न झाल्यामुळे दिवसभर अस्वस्थता जाणवते. पण यावर एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे - रात्री झोपण्यापूर्वी मनुका खाणे.

**मनुके खाण्याचे फायदे:**

बद्धकोष्ठतेपासून आराम: मनुकामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असते. हे फायबर आतड्यांच्या कार्याला चालना देते, ज्यामुळे शौच सुलभ होते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. आतड्यांचे आरोग्य: मनुकातील सॉर्बिटॉल नावाचा नैसर्गिक घटक आतड्यांमध्ये पाणी खेचून घेतो, ज्यामुळे मल मऊ होण्यास मदत होते. यामुळे सकाळी सहजपणे पोट साफ होते. पचन सुधारते: मनुका नियमित खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि पोटाचे आरोग्य चांगले राहते.

**मनुका खाण्याची योग्य पद्धत:**

रात्री भिजत घाला: रात्री झोपण्यापूर्वी ५-६ मनुके पाण्यामध्ये भिजत घाला. सकाळी खा: सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी हे मनुके चावून खा आणि ते पाणी प्या. यामुळे पचनक्रिया अधिक वेगाने काम करते. केवळ मनुकेच नाही तर सुक्या मेव्यामध्ये अंजीर, खजूर आणि जर्दाळू हे सुद्धा बद्धकोष्ठतेसाठी फायदेशीर आहेत. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. मात्र, कोणत्याही उपायाचा अवलंब करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे नेहमीच योग्य असते.

# बारीक लोकांनी बॉडीबिल्डिंग करताना चुकूनही खाऊ नका हे पदार्थ, नाहीतर...

बारीक लोकांनी बॉडीबिल्डिंग करताना चुकूनही खाऊ नका हे ५ पदार्थ, नाहीतर...

मुंबई : आजकाल अनेक तरुणांना सुडौल आणि मजबूत शरीर (ग्ीलश्रश ल्रीळश्रवळपस) बनवण्याची आवड आहे. यासाठी ते जिममध्ये तासनतास व्यायाम करतात. मात्र, चांगल्या शरीरासाठी फक्त व्यायाम पुरेसा नाही, तर आहाराची (वळशीं) भूमिका खूप महत्त्वाची असते. जर तुम्ही तुमच्या आहारात काही चुकीच्या गोष्टी खात असाल, तर तुमच्या मेहनतीवर पाणी फिरू शकते. त्यामुळे, स्नायू (ग्ीलश्रशी) वाढवण्यासाठी कोणत्या गोष्टी टाळाव्यात, ते जाणून घेऊया.

१. तळलेले आणि जंक फूड

समोसे, भजी, वडापाव, फ्रेंच फ्राइज आणि पिझ्झा-बर्गरसारखे पदार्थ चविष्ट असले तरी ते तुमच्या आरोग्यासाठी आणि मसल बिल्डिंगसाठी अत्यंत हानिकारक आहेत. या पदार्थांमध्ये 'ट्रान्स फॅट' (ढीरपी ऋीं) आणि जास्त प्रमाणात कॅलरी (उरश्रेीळशी) असतात. हे फॅट तुमच्या शरीरात जमा होतात, ज्यामुळे चरबी वाढते आणि स्नायूंच्या वाढीस अडथळा येतो.



२. गोड पेये आणि साखरेचे पदार्थ:

कोल्ड्रिंक्स, सोडा, ज्यूस आणि एनर्जी ड्रिंक्समध्ये मोठ्या प्रमाणात साखर आणि फ्रक्टोज कॉर्न सिरप (ऱ्रीलींेश उेीप ड्ढीीि) असते. यामुळे शरीरातील इन्सुलिनची पातळी वाढते, ज्यामुळे वजन वाढते आणि स्नायूंच्या वाढीसाठी आवश्यक पोषक तत्वे शोषली जात नाहीत. गोड पदार्थ खाल्ल्याने लवकर भूक लागते.

३. अति प्रमाणात प्रक्रिया केलेले मांस

सॉसेज (डरीीरसश), हॉट डॉग्स (केीं ऊेसी), हॅम (क्रा) आणि बेकन (इरलेप) यांसारख्या प्रक्रिया केलेल्या मांसामध्ये सोडियम (डेवळीा), नायट्रेट्स (छळ-ीीरींशी) आणि प्रिझर्वेटिव्ह (झीशीशीीिरींळींशी) जास्त असतात. हे पदार्थ स्नायूंच्या आरोग्यासाठी चांगले नाहीत. त्याऐवजी तुम्ही चिकन, मासे किंवा अंडी यांसारख्या नैसर्गिक प्रोटीन स्रोतांचा वापर करू शकता.

४. जास्त मीठ असलेले पदार्थ:

अति प्रमाणात मीठ खाल्ल्याने शरीरात पाण्याचे प्रमाण वाढते (थरींशी ठशींशपींळेप), ज्यामुळे शरीर सुजल्यासारखे दिसते. यामुळे तुमचे स्नायू योग्यरित्या 'कट' दिसत नाहीत. चिप्स, पॅक केलेले स्नॅक्स आणि काही सॉसेज यांसारख्या पदार्थांमध्ये मीठ जास्त असते. त्यामुळे, असे पदार्थ खाणे टाळा.

५. जास्त प्रमाणात मद्यपान

दारू प्यायल्याने स्नायू तयार होण्याच्या प्रक्रियेला बाधा येते. दारू शरीरातील प्रोटीन संश्लेषण कमी करते, जे स्नायूंच्या वाढीसाठी खूप महत्त्वाचे आहे. जास्त प्रमाणात दारू प्यायल्याने टेस्टोस्टेरॉनची पातळी कमी होते आणि कोर्टिसोलची पातळी वाढते, ज्यामुळे स्नायू तुटायला लागतात.

या पाच गोष्टी टाळून तुम्ही तुमच्या शरीराला योग्य पोषण देऊ शकता आणि तुमचे बॉडीबिल्डिंगचे ध्येय सहज गाठू शकता. नियमित व्यायाम आणि योग्य आहार यांचा समन्वय साधणे महत्त्वाचे आहे.

## आजारापासून दूर राहण्यासाठी — डॉक्टर टीप्स



हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.शरीराच्या मजबुती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हे जीवनसत्त्व उपयोगी आहे. त्यामुळे त्याचा डोस पुरेशा प्रमाणात घेणं गरजेचं आहे. (**क्रमश:**)

नाही होणार बाजूला!
जो प्राणी रहदारीत जेवढा जास्त अडथळा आणेल, तो तेवढा मोठा जनसेवक असतो...मी पण आहे!



## विनोद

**बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, ङ्गआई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही!फ आईने विचारले, ङ्गअरे वा. प्रश्न काय होता.फ शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!फ**

## संदेश

Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon?
Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## सुविचार

प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.
- पु.ल. देशपांडे




**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा॥**

अर्थ -बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

## उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

## आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

## उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ




# बीग बॉसमध्ये टायसन आणि द अंडरटेकरची एन्ट्री होणार?

मुंबई : टीव्हीवरील लोकप्रिय रिलिटी शो बिग बॉस चा १९वा सीझन लवकरच सुरू होणार असून, या सीझनमध्ये काही मोठा धमाका होण्याची शक्यता आहे. सूत्रांनुसार, या शोमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील दोन दिग्गज व्यक्ती, बॉक्सिंग लीजेंड माईक टायसन आणि थथए सुपरस्टार द अंडरटेकर, हे वाईल्ड कार्ड एंट्री म्हणून सहभागी होणार असल्याची जोरदार चर्चा आहे.बिग बॉस च्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय स्टार्सची एन्ट्री होणार असल्याने, प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. रिपोर्टनुसार, माईक टायसन ऑक्टोबर महिन्यात काही दिवसांसाठी खास पाहुणा म्हणून घरात येईल. तर, 'डेडमॅन' नावाने ओळखला जाणारा द अंडरटेकर नोव्हेंबर महिन्यात वाईल्ड कार्ड एंट्री घेईल.

या दोन्ही स्टार्सच्या एन्ट्रीची बातमी सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. विशेषतः, थथए आणि सलमान खानच्या चाहत्यांना 'अंडरटेकर'ला 'बिग बॉस' च्या घरात पाहण्याची उत्सुकता लागून राहिली आहे. काही रिपोर्ट्सनुसार, द अंडरटेकरला 'बिग बॉस' च्या इतिहासातील सर्वात जास्त मानधन दिले जाणार आहे. यापूर्वी द ग्रेट खली 'बिग बॉस ४' मध्ये सहभागी झाला होता आणि त्याला एका आठवड्यासाठी ५० लाख रुपये मिळाले होते. द अंडरटेकरची फी त्यापेक्षा खूप जास्त असू शकते, असा अंदाज आहे.

या सीझनमध्ये बॉलीवूड, टीव्ही आणि सोशल मीडियातील अनेक प्रसिद्ध चेहरे सहभागी होणार आहेत. यामध्ये गौरव खन्ना, अशनूर कौर, अव्हेझ दरबार आणि नगमा मिराजकर यांच्या नावांची चर्चा आहे. बिग बॉस १९ चा ग्रँड प्रीमियर २४ ऑगस्ट रोजी कलर्स टीव्ही आणि जिओ हॉटस्टारवर होणार असून, नेहमीप्रमाणेच सलमान खान शो होस्ट करणार आहे. मात्र, माईक टायसन आणि अंडरटेकरच्या एन्ट्रीच्या बातमीने या सीझनची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



# जेलर २ मध्ये रजनीकांत – मिथुन यांची जोडी पुन्हा झळकणार

साउथचा सुपरस्टार आणि चाहत्यांच्या मते 'भगवान' असलेले रजनीकांत सध्या त्यांच्या 'कुली' या चित्रपटामुळे प्रचंड गाजत आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अफाट यश मिळवल्यानंतर आता रजनीकांत त्यांच्या ब्लॉकबस्टर प्रोजेक्ट 'जेलर'च्या सिक्वल म्हणजेच 'जेलर २' मध्ये दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन पुन्हा एकदा नेल्सन दिलीपकुमार करणार आहेत. प्रेक्षकांमध्ये आधीच या चित्रपटाबद्दल उत्सुकता होती आणि आता यात बॉलीवूडचे दिग्गज अभिनेता मिथुन चक्रवर्ती यांच्या दमदार एंट्रीमुळे ही उत्सुकता अजूनच वाढली आहे. मिथुन चक्रवर्ती यांना 'जेलर २' मध्ये अतिशय महत्त्वाच्या भूमिकेसाठी निवडण्यात आले असून ते लवकरच रजनीकांतसोबत शूटिंग सुरू करणार आहेत. विशेष म्हणजे, रजनीकांत आणि मिथुन यांची जोडी यापूर्वीही झळकली आहे. त्यांनी हिंदी चित्रपट 'भ्रष्टाचार'(१९८९) आणि बंगाली चित्रपट 'भाग्य देवता' (१९९७) मध्ये एकत्र काम केले होते.

# जॉन अब्राहमची आधी सर्वोच्च न्यायालयाला विनंती



नागपूर-सर्वोच्च न्यायालयाने श्वानांच्याबाबतीत दिलेल्या निर्णयानंतर श्वानप्रेमी आणि त्यांच्या संस्था यांनी या निर्णयाला विरोध केला. दरम्यान आता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा याबाबत थोडी सौम्य भूमिका घेतली आहे. यावर अंतरिम स्थगिती आदेश देण्यात आला आहे. तसेच या प्रकरणावर पुढील सनावणी आठ आठवड्यांच्या आत केली जाणार आहे.माणूस आणि श्वान यांचे शांततापूर्ण सहअस्तित्त्व असले पाहीजे आणि कुत्र्यांना रस्त्यावरुन हटवले जाऊ नये, असे सांगत पेटा इंडियाचे मानद संचालक जॉन अब्राहम यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले आहे. माणूस आणि श्वान यांच्यात सहअस्तित्त्व असेल तर नसबंदी आणि लसीकरणासाठी ते सोपे जाईल. श्वानांना खाद्य देणाऱ्यांची भूमिका ओळखली पाहीजे आणि त्यांचा आदर केला पाहीजे. श्वानांची संख्या अधिक वाढू नये म्हणून प्रत्येक नगरपालिकांनी त्यांच्या जन्मदर नियंत्रण कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. तसेच महापालिकेनेच प्रत्येक गल्लीत त्यांच्यासाठी पुरेसे खाद्य उपलब्ध करुन दिले पाहिजेत, असेही जॉन अब्राहम यांनी म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वी अभिनेता जॉन अब्राहम यांनी भारताचे माननीय सरन्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण गवई यांना एक तातडीची विनंती केली. ज्यामध्ये दिल्लीतील सामूदायिक श्वानांना आश्रयस्थाने आणि दूरच्या ठिकाणी हलवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अलिकडच्या निर्देशांचा आढावा घेण्याची विनंती केली होती. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने दिल्लीतील सर्व भटक्या श्वानांना सार्वजनिक ठिकाणातून आश्रयस्थानांमध्ये किंवा दूरच्या भागात हलवण्याचे निर्देश दिले होते. मात्र, हे भटके श्वान नसून सामूदायिक श्वान आहेत. स्वत: दिल्लीकरांनी त्यांचा आदर केला आहे आणि त्यांच्यावर प्रेम केले आहे, जे पिढ्यानपिढ्या माणसांचे शेजारी म्हणून या प्रदेशात राहत आहेत. अनेक दशकांपासून प्राण्यांच्या संरक्षणात काम करणारी व्यक्ती म्हणून, मी आदरपूर्वक हे सांगू इच्छितो की, जयपूरने ७० टक्केपेक्षा जास्त श्वानांची नसबंदी केली आहे. लखनऊमध्ये ८४ टक्के श्वानांची नसबंदी झाली आहे. त्यामुळे दिल्लीही तेच साध्य होऊ शकते. नसबंदी दरम्यान, कुत्र्यांना रेबीज विरूद्ध लसीकरण केले जाते आणि नसबंदीमुळे प्राणी शांत होतात, कमी मारामारी आणि चावतात, कारण त्यांच्याकडे संरक्षण करण्यासाठी कोणतेही पिल्लू नसते. दिल्लीत अंदाजे १० लाख कुत्रे आहेत. त्या सर्वांना आश्रय देणे किंवा त्यांचे स्थलांतर करणे व्यावहारिक किंवा मानवीय नाही. त्यांना एकाच ठिकाणी ठेवल्यास वाद निर्माण होतील आणि सार्वजनिक आरोग्याचे धोके निर्माण होतील.

# राजकुमार यांनी मृत्यूआधी का व्यक्त केली अशी इच्छा?

मुंबई-दिवंगत अभिनेता राज कुमार हे त्यांच्या स्पष्ट वक्तव्यासाठी ओळखले जात होते. अमिताभ बच्चन, सलमान खान आणि गोविंदा सारख्या कलाकारांनी देखील त्यांची सडेतोड उत्तर दिलं होतं अनेकदा त्यांच्या तोडांवर जे काही म्हणणं आहे ते सांगितलं. त्यांचे असे अनेक किस्से चांगलेच लोकप्रिय आहेत. पण तुम्हाला या गोष्टीचं आश्चर्य होईल की त्यांच्या अंत्यविधीला कोणी येऊ नये अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी त्या मागचं कारण देखील सांगितलं होतं. जे ऐकून सगळ्यांना विचार करायला भाग पाडलं. राज कुमार यांचा जन्म हा ८ ऑक्टोबर १९२६ मध्ये पाकिस्तानच्या लोरलाईमध्ये झाला. राज कुमार यांनी तिच्या करिअरमध्ये खूप नाव कमावलं. चाहते राज कुमार यांच्या अभिनयासोबत त्यांच्या डायलॉग डिलिव्हरीचे देखील वेडे होते. पण या त्यांच्या अचानक झालेल्या निधनानं सगळ्यांना मोठा धक्का बसला.

खरंतर, राज कुमार यांनी त्यांच्या शेवटच्या काळात अचानक त्यांना घश्याचा कॅन्सर झाला. या गंभीर आजारानं त्यांचं ३ जुलै १९९६ रोजी मुंबईत निधन झालं. राज कुमार यांचं निधन होण्याआधी त्यांना ती चाहूल लागली होती. गळ्यातील कॅन्सरला पाहता त्यांनी वयाच्या ७० व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. एक दिवस त्यांनी कुटुंबातील लोकांना बोलावलं आणि त्यांना स्पष्ट सांगितलं की, ममाझं निधन झाल्यानंतर त्याविषयी कोणाला काही सांगू नका. मला अग्नी द्या आणि माझा अंत्यविधी करा. त्यानंतर लोकांना माझ्या निधनाची बातमी राज कुमार यांच्या अंत्ययात्रे विषयी देखील काही माहिती नाही...राज कुमार राव यांचा अंत्यविधी कुठे आणि कधी झाला. त्याविषयी अधिकृत माहिती कोणत्याही प्रकारे नाही. त्यांच्या इच्छे प्रमाणे त्यांच्या कुटुंबानं गुपचूप त्यांच्या पार्थीवावर अंत्यविधी केला. खरंतर, त्यांची इच्छा होती की त्यांच्या निधनानंतर कोणीच त्यावरून खिल्ली

# गोविंदाचा घटस्फोट होणार? सुनीता आहुजाकडून केस दाखल



मुंबई-बॉलिवूड अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा वेगाने सुरु आहेत. सुनीता आहुजाने नुकतेच एका व्लॉगमध्ये गोविंदासोबतच्या घटस्फोटाच्या अफवा सुरु असल्याचे सांगितले होके. आता एका नवीन अपडेटनुसार सुनीता यांनी वांद्रे फॅमिली कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केलाय. यामुळे मनोरंजन विश्वात खळबळ उडाली आहे.

सुनीता अहुजाने गोविंदाविरुद्ध मप्रेम-विवाहात फसवणूक करणे, त्रास देणे आणि वेगळे राहणेफ या कारणावरून घटस्फोट मागितला आहे. सुनीता आहुजाने हिंदू विवाह कायदा १९५५ च्या कलम १३ (१) (ा), (ग्र), (ं) अंतर्गत घटस्फोटासाठी अर्ज दाखल केल्याचे वृत्त समोर आले आहे.

महॉटरफ्लायफच्या अहवालात असा दावा करण्यात आलाय.

समोर आलेल्या मीडियानुसार, न्यायालयाने २५ मे रोजी गोविंदाला समन्स बजावले होते आणि जूनपासून दोघेही ते सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. सुनीता सुनावणीदरम्यान वारंवार न्यायालयात हजर राहते पण गोविंदा उपस्थितन नसतो. यापूर्वी, सुनीता यांनी तिच्या व्लॉगमध्ये घटस्फोटाच्या अफवा असल्याचे म्हटले होते.

मराठी अभिनेत्रीसोबतचे अफेअर?

गोविंदाचे ३० वर्षीय मराठी अभिनेत्रीसोबतचे अफेअर असल्याची चर्चा यावर्षी फेब्रुवारी मध्ये झाली. गोविंदा आणि सुनीता आहुजा यांनी सततच्या मतभेदांमुळे आणि वेगवेगळ्या लाईफस्टाईलमुळे वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त पुढे आले होते. त्यात गोविंदाच्या अफेयरचीदेखील चर्चा होती. गोविंदाचे ३० वर्षीय मराठी अभिनेत्रीशी वाढती जवळीक हे त्यांच्या कथित वेगळे होण्याचे मुख्य कारण असल्याचीदेखील चर्चा आहे. या जोडप्याने सहा महिन्यांपूर्वी घटस्फोटासाठी अर्ज केला असला तरी ते पुन्हा एकत्र येत आहेत, असे वकिलांनी सांगितलंय. सुनीता आहुजाची यूट्यूब एन्ट्री

सुनीता आहुजाने अलीकडेच यूट्यूब चॅनल सुरू करून ब्लॉगिंगला सुरुवात केली. त्यांच्या पहिल्या व्हिडीओत त्या चंदीगडच्या माँ काली मंदिरात दर्शनासाठी गेली. जिथे ती भावनिक झालेली दिसली. तसच मफ्लोकांनी खूप पैसे कमावले, आता माझी वेळ आलीय.फ्फ असे मजेत म्हटलंय.सुनीताने मंदिरात पुजाऱ्याशी बोलताना भावनिक होऊन सांगितले की, गेल्या दीड वर्षात त्यांच्या आणि गोविंदाच्या नात्याबाबत अनेक नकारात्मक बातम्या पसरल्या. त्यांनी स्पष्ट केले की, माँ कालीवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे आणि ती त्यांचे कुटुंब तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना सोडणार नाही, असेही तिने म्हटले.

# स्वरा भास्कर बायसेक्शुअलवर एक्सवर करुन टाकले जाहीर, म्हणाली



मुंबई,२२ ऑगस्ट (पीएसआय) बॉलिवूड अभिनेत्री स्वरा भास्कर सध्या आपल्या एका विधानामुळे चर्चेत आहे. समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव आपल्या क्रश असल्याची तिने जाहीरपणे कबुली दिली आहे. यानंतर आता तिने आपल्या एक्सवरील बायोमध्ये बदल केला आहे. यामध्ये तिने स्वत:ला मत्रळीश्र ऱ्ीीह रर्वोलरींशफ असे म्हटले आहे. इतकंच नाही तर याचा अभिमान बाळगत तिने शुक्रवारी सकाळी बायोमध्ये केलेल्या बदलाचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. व्हायरल झालेल्या मुलाखतीत तिने लोक कशाप्रकारे बायसेक्शुअल असतात याबद्दल सांगितले होते.अपडेट केलेल्या बायोमध्ये आता तिने लिहिलं आहे की, मफ्मार्ल क्रश ॲडव्होकेट. पार्ट-टाइम अभिनेत्री, पूर्ण-वेळ ट्विटर कीटक. केओस म्हणजे गोंधळाची क्वीन. सर्वनाशातून माझ्या मार्गावर प्रवास करताना. पॅलेस्टाईन मुक्त करा.फ्फ हा बदल तिने अशावेळी केला आहे, जेव्हा तिच्या विधानांमुळे सोशल मीडियावर खळबळ उडाली आहे.

स्वरा भास्करने तिचा पती फहाद अहमद याच्यासोबतच्या मुलाखतीदरम्यान बायसेक्शुअल विषयावर आपला दृष्टीकोन मांडला होता. स्क्रीनला दिलेल्या मुलाखतीत तिने स्पष्टपणे सांगितलं की, मफ्आपण सर्व बायसेक्शुअल आहोत. जर तुम्ही लोकांना स्वत:वर सोडले तर आपण प्रत्यक्षात बायसेक्शुअल आहोत. विषमलैंगिकताही एक विचारसरणी आहे जी हजारो वर्षांपासून सांस्कृतिकदृष्ट्या (आपल्यामध्ये) रुजवली गेली आहे. कारण मानवजात अशाच प्रकारे टिकून राहील, म्हणून ती सर्वसामान्य असली पाहिजे.फ्फ

जेव्हा तिला विचारण्यात आले की तिचं कोणी क्रश आहे का? तेव्हा तिने समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांचं नाव घेतले.

याआधी तिने डिंपल यादव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारी पोस्ट लिहिली होती. तिने लिहिले होते ी, मफ्सदैव सुंदर आणि अद्भुत डिंपल यादव यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! पुढील वर्ष खूप छान जावो.फ्फ मुलाखतीत, तिने हेदेखील मान्य केले की तिच्या विधानांचा तिच्या पतीच्या महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील राजकीय भवितव्यावर परिणाम होऊ शकतो.

स्वरा भास्कर विविध सामाजिक मुद्द्यांवर स्पष्टपणे बोलली आहे आणि त्यामुळे तिला अनेक वादांना तोंड द्यावं लागत आहे. ती अनेकदा सामाजिक बंधने, नियम या विषयांवर तिच्या प्रेक्षकांशी संवाद साधण्यासाठी तिच्या व्यासपीठाचा वापर करते. २०२३ मध्ये, तिने आणि फहाद अहमदने त्यांची मुलगी राबियाचे स्वागत केले.

कामाच्या बाबतीत बोलायचं गेल्यास भास्कर सध्या तिच्या पतीसोबत मपती, पत्नी और पंगाफ या शोमध्ये दिसली आहे. ती शेवटची २००२ मध्ये आलेल्या मजहाँ चार यारफ या चित्रपटात दिसली

# कुत्र्यांसाठी आंदोलन करणाऱ्यांवर संतापले राम गोपाल वर्मा



ढोंगी श्वानप्रेमींनो, तुमचा मेंदू चालत नाहीए का...

राष्ट्रीय राजधानीत भटक्या कुत्र्यांच्या चाव्यांमुळं रेबीजग्रस्तांची संख्या वाढली आहे, या २८ जुलै रोजीच्या याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठानं एकापाठोपाठ अनेक आदेश दिल्लीतील यंत्रणांना दिले.

मुंबई: सर्वोच्च न्यायालयानं गेल्या आठवड्यात राजधानी परिसरातून भटक्या कुत्र्यांना हद्दपार करण्याचे आदेश दिल्ली सरकारला दिले होते. दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे.

दिल्लीत कुत्र्यांच्या हल्ल्याच्या वाढत्या घटना, रेबीजचे रुग्ण आणि त्यामुळं होणारे मृत्यू या पार्श्वभूमीवर न्यायालयानं हा निर्णय दिला आहे. या निर्णयावर अनेक सेलिब्रिटींनी नाराजी व्यक्त केली, तर राम गोपाल वर्मा यांनी या निर्णयाचं समर्थन केलं आहे. त्यांनी खोट्या श्वानप्रेमींची शाळा घेतली असून, त्यांनी ढोंगी म्हटलंय. खोटं श्वान प्रेम दाखवणाऱ्यालोकांसाठी त्यांनी एक सविस्तर पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी कुत्र्यांमुळं होणाऱ्या धोक्यांविषयी आणि त्यावर तोडगा काढण्याविषयी भाष्य केलं आहे. राम गोपाल वर्मा यांनी मएक्सफ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपले विचार मांडले आहेत. ढोंगी श्वानप्रेमींनो... तुम्ही आंधळे, बहिरे झाला आहात का? ती तुमचा मेंदूच काम करत नाहीये. भटकी कुत्रे लहान मुलांना चावत आहेत, त्यांचे लचके तोडत आहे, अनेक सीसीटीव्ही व्हायरल होतायत, ते दिसत नाहीये का तुम्हाला? रेबीजचे वाढते रुग्ण दिसत नाहीयेत का? असंही त्यांनी म्हटलं आहे.

आणीबाणीच्या स्थितीत जसे आग, पूर किंवा दंगलीमध्ये सर्वप्रथम लोकांना वाचवणं महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे कुत्र्यांच्या हल्ल्यांपासून लोकांना वाचवणं महत्त्वाचे आहे, असं त्यांचं म्हणजेच कोर्टाचं म्हणणे आहे. भारतात कुत्रे लहान मुलांना चावत आहेत आणि लोक दया आणि करुणेवर ढएऊीरश्रज्ञी आयोजित करत आहेत, यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली.

मवीण दोघांतली ही तुटेनाफ ही मालिका स्वीकारताना तेजश्रीनं घेतलेला बराच वेळ? स्वत:च सांगितलं कारण म्हणाली...

जारण चित्रपटाच्या ट्रेलर लाँचला अमृताने अनिता दातेची पोल खोलली

सर्वोच्च न्यायालयानं रस्त्यांवरील कुत्र्यांच्या धोक्याच्या समस्येवर शिक्कामोर्तब केलं आहे, असं राम गोपाल वर्मा यांनी म्हटलंय. सामूहिक लसीकरण हा प्रभावी उपाय नाही, कारण रस्त्यांवर कुत्र्यांना पकडणं सोपं नाहीए, असंही ते म्हणाले. जिथं या श्वानांना ठेवण्यात येणार आहे, तिथंही आजार पसरण्याचा धोका आहे, असं मतही राम गोपाल वर्मांनी व्यक्त केलं. तसंच या निवारा केंद्रांमध्ये ठेवण्याचा खर्चही मोठा आहे, यावरही त्यांनी भाष्य केलंय.

राम गोपाल वर्मा यांच्या या प्रतिक्रियेमुळं सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी त्यांच्या मताचे समर्थन केलं आहे, तर काहींनी त्यांच्या भूमिकेवर टीका केली आहे.

# डिपार्टमेंट ऑफ फिजिक्स अँड इलेक्ट्रॉनिक्स, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर आणि बिनस ग्रॅज्युएट प्रोग्राम, बिनस युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया यांच्यात कायदेशीर करार

**लातूर/प्रतिनिधी** : शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी डिपार्टमेंट ऑफ फिजिक्स अँड इलेक्ट्रॉनिक्स आणि बिनस युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया यांच्यात रोबोटिक्स, वायरलेस सेन्सर नेटवर्क आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अत्याधुनिक तंत्रज्ञान विषयांवर शैक्षणिक व संशोधन कायदेशीर करार केला आहे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात रोबोटिक्स, वायरलेस सेन्सर नेटवर्क आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही क्षेत्रे जगभरात संशोधन आणि औद्योगिक क्रांतीची नवी दारे उघडत आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. टी. एच. मुजावर, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख, दयानंद विज्ञान महाविद्यालय यांनी बिनस ग्रॅज्युएट प्रोग्राम, बिनस युनिव्हर्सिटी, इंडोनेशिया यांच्यासोबत शैक्षणिक आणि संशोधन कायदेशीर करार करून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.यामुळे विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रयोग, प्रकल्प कार्य, संयुक्त




संशोधन व आंतरराष्ट्रीय आदानप्रदान कार्यक्रमाचा लाभ घेता येणार आहे. यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण अधिक गतिमान होईल, तसेच विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संशोधन व उद्योजकतेचे दालन खुले होईल.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांचे म्हणणे आहे की, ''या करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय संशोधनात सहभागी होता येईल. तंत्रज्ञानातील नावीन्याचा शोध घेण्याची आणि त्यातून उद्योगधंद्यांना उपयुक्त तोडगे सुचवण्याची संधी उपलब्ध होईल.''

विशेष म्हणजे, आजच्या औद्योगिक जगतात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि वायरलेस सेन्सर नेटवर्कचा वापर स्मार्ट सिटीज, आरोग्य सेवा, शेती, रोबोटिक्स, संरक्षण व्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने केलेला हा केवळ औपचारिक करार नसून, तो विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी ज्ञान, नवोपक्रम आणि संशोधनाचे नवे क्षितिज उघडणारा ठरेल.

या उपक्रमामुळे महाविद्यालयाचे नाव केवळ राष्ट्रीय पातळीवरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातही झळकणार आहे. अशा प्रकारचे सहकार्य भारतीय महाविद्यालयांनी जागतिक दर्जा मिळविण्यासाठी घेतलेली धडपड अधिक ठळकपणे अधोरेखित करते.या करारामुळे दोन्ही संस्थांदरम्यान संयुक्त संशोधन, प्रकल्प कार्य, विद्यार्थी व शिक्षक आदानप्रदान, ऑनलाईन व्याख्याने, तसेच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच त्यांनी असे म्हटले की

''या कायदेशीर करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांचे करिअर घडविण्यासाठी हा करार महत्त्वाचा टप्पा ठरेल.'' , ''या करारामुळे आमच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे तांत्रिक ज्ञान व कौशल्य मिळेल. यामुळे नाविन्यपूर्ण संशोधन व उद्योजकतेस नवे आयाम मिळतील.''

या यशाबद्दल डॉ. टी. एच.मुजावर, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला असून, पुढील काळात या सहकार्याचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी महाविद्यालय कटिबद्ध आहे.या करारानुसार विद्यार्थी व शिक्षक आदानप्रदान कार्यक्रम, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक परिषद, कार्यशाळा तसेच इतर शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे ठरले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्ञान, कौशल्य आणि संशोधनाची नवी दारे खुली होणार आहेत.

तसेच आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे प्रतिनिधी प्रा. सानी इसा, व प्रो. फोर्ड यांनी या कराराद्वारे दोन्ही संस्थांमध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन परस्पर सहकार्य अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## 'मुक्तांगण' च्या चिमुकल्यांचा पोळा सण साजरा




**लातूर/प्रतिनिधी** : विशाल नगर येथील साई मंदिर समोरील मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये चिमुकल्यांनी बैल पोळा सण उत्साहात साजरा केला. प्रथम शाळेच्या आवारात शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते बैलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका तमन्ना शेख यांनी बैल पोळा सणाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली, पोळा सणाचा शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह असतो. शेतकरी बैलांना सजवतात व मिरवणुकीत भाग घेतात. या दिवशी महाराष्ट्रातील खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. गावातल्या सर्व बैलजोड्या वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात तेथून बैलांची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. शेतकरी वर्गात हा सण विशेष महत्त्वाचा मानला गेल्याने तो उत्साहाने साजरा करण्यात येतो हे त्यांनी सांगितले. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना शाळे तर्फे बैल पोळा सणाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका मयुरी देशमुख यांनी केले, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## गोसावी प्रतिष्ठानच्या मेळाव्यास उपस्थित राहावे: अनिल पुरी

**लातूर/प्रतिनिधी** : गोसावी समाज प्रतिष्ठान लातूर आयोजित त्रिसुत्री कार्यक्रम दिनांक २३ ऑगस्ट वार शनिवार रोजी सकाळी दहा वाजता भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रतिष्ठानचे प्रमुख अनिल पुरी यांनी केले आहे



प्रतिष्ठानच्या वतीने गेली अठावीस वर्षा पासून विविध सामाजिक उपक्रम घेतले जातात.याचाच एक भाग म्हणून समाजात उल्लेखनीय काम करणाऱ्या समाज बांधवांना विविध पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते यावेळी सन्मानित केले जाणार आहे. इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव ही केला जाणार आहे.तसेच महाराष्ट्रातील विविध निमंत्रीत मान्यवरांचे मार्गदर्शन याप्रसंगी होणार आहे.तरी या भव्य-दिव्य सामाजिक कार्यक्रमाला जास्तीतजास्त गोसावी समाज बांधवानी उपस्थित राहाण्याचे आवाहन गोसावी समाज प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे २ सप्टेंबर रोजी आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** :जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रत्येकी महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते, तथापि माहे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या सोमवारी म्हणजेच १ सप्टेंबर, २०२५ रोजी ज्येष्ठ गौरीपूजनाची सुट्टी असल्यामुळे सप्टेंबर, २०२५ मधील जिल्हास्तरीय लोकशाही दिन मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २७ ऑगस्ट, १ सप्टेंबर रोजी राहणार बंद, ३१ ऑगष्ट रोजी बाह्यरुग्ण विभाग सुरु राहणार

**लातूर/प्रतिनिधी** : गणेश चतुर्थी असल्याने बुधवार, २७ ऑगस्ट, २०२५, तसेच सोमवार, १ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ज्येष्ठागौरी पूजननिमित्त स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने या दोन्ही दिवशी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील. मात्र, रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी बाह्यरुग्ण विभाग सुरु राहील. तसेच मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

# नाट्य रसिकांसाठी एकांकिकेची मेजवानी

## लातूरच्या नाट्यविश्वाला बळकटी देणारा उपक्रम, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी लातूर मध्ये

**लातूर/प्रतिनिधी** : रंगभूमीची मध्यवर्ती संघटना असलेली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित, शतकमहोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त सुरू झालेला नाट्यकलेचा जागर दरवर्षी महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. त्याच अनुषंगाने यंदाही नाट्य परिषद करंडक एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याची प्राथमिक फेरी दिनांक २४ ऑगस्ट वार रविवार रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार असल्याची माहिती लातूर नाट्य परिषद महानगर शाखेचे अध्यक्ष ॲड शैलेश गोजमगुंडे यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

या स्पर्धेत लातूर मधून १२ संघ सहभागी होत असून यात शहरातील ११२ तरुण व अनुभवी कलाकार, तंत्रज्ञ सहभागी होत आहेत. ही स्पर्धा दर वर्षी होणार असून त्याचे प्राथमिक फेरीचे केंद्र लातूर असणार आहे. तर अंतिम फेरी मुंबई येथे होणार आहे. लातूर केंद्रावरून प्रथम येणारी एकांकिका अंतिम फेरीस पात्र ठरणार आहे. पात्र एकांकिकेतील कलाकारांना मुंबईत सादरीकरणसोबतच दिग्गज मान्यवरांच्या मार्गदर्शनात नाट्यप्रशिक्षण दिले जाणार आहे. याशिवाय सहभागी प्रत्येक संघास प्रत्येकी रु. २००० निर्मिती खर्च दिला जाणार आहे.

अंतिम फेरीत भरघोस बक्षिसे असलेल्या या स्पर्धेत लातूरतील तालीम स्वरूपात होणाऱ्या प्राथमिक फेरीत ड्रायव्हर (राजर्षी शाहू मह.), दि फिअर फॅक्टर,(फ्रिलान्सर), दि रिंग अगेन (सूर्योदय सांस्कृतिक कलामंच) अध्याय पाचवा (कलारंग सांस्कृतिक संस्था), गांधी कधी येणार (नाट्यनिकेतन), आंबेडकरीजम (लक्ष्मीनामा फाउंडेशन) यथार्थ (कलोपासक मंडळ ), येडी बाभळ (कॉकसिट महा.), जाहला सोहळा अनुपम (जयक्रांती अध्यापक महा.), लेकरू (मानवता बहु. सेवा. संस्था), बट बिफोर लिव्ह (शाहू महा. अटोनॉमस) मैं वारी जावा (रसबहार कलामंच) आदी एकांकिका सादर होणार आहेत.

या महोत्सवास लातूरकर रसिकांनी आवर्जून उपस्थित रहावे, नाट्यास्वाद घ्यावा व कलावंतांचा उत्साह वाढवावा असे आवाहन स्पर्धा केंद्रप्रमुख ॲड शैलेश गोजमगुंडे, स्पर्धा समन्वयक डॉ. मुकुंद भिसे व प्रा. डॉ. दिपक वेदपाठक, प्रदीप पाटील खंडापूरकर, धनंजय बेंबडे, अनील पुरी, यांनी केले आहे.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये पोळा सण साजरा

**लातूर/प्रतिनिधी** : मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लातूर येथील लॉर्ड श्रीकृष्ण् इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांनी बैल पोळा सण उत्साहात साजरा केला.

या प्रसंगी बैलांची पूजा करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांच्या हस्ते बैलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील सणांची ओळख व्हावी या दृष्टीने लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये आज बैल पोळा सण साजरा केला. शाळेच्या शिक्षिका विद्या पाटील यांनी बैलपोळा सणा विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. बैलपोळा सण शेतकऱ्यांसाठी अंत्यत उत्साहाचा असतो. शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात बैलांवर अवलंबून आहे. त्यामुळे बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ग्रामीण भागातील लोक पोळा सण साजरा करतात. या दिवशी बैलाची पूजा करून त्याची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. महिला घरामध्ये मातीच्या बैलांची पूजा करून पूजा करतात. या दिवशी गोड-धोड नैवेद्य बैलांना खाण्यासाठी पुरणपोळी, कढी, भजे यासारखे वेगवेगळे पदार्थ बनवतात.

शाळेतील सूर्यवंशी स्वराज, कापसे ईश्वरी, मासलकर अथर्व, कांबळे स्वरा, रेड्डी आरुष, माळी पुर्वा, कांबळे विश्व, शिंदे ईश्वरी, मुंडे उत्कर्ष, गायके त्रिशा, सोट पाटील अवनीश, वाघमारे हिरण्या, कदम भाग्यश्री, रकटे प्रथमेश, सोळंके संचिता, कापसे श्रद्धा, कुलकर्णी अंश, वाडकर श्रावणी, बिर्ले रुची, गोडसे अर्जुन, सुकणे मानसी, दुलेवाड धीरज, मोरे जान्हवी, जाधव ऋग्वेद, बोराडे पूर्वा या विद्यार्थ्यांनी बैल पोळा या सणाविषयी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना शाळेतर्फे बैल पोळा सणाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका दिव्या लाळे यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# विलासराव देशमुख फाउंडेशन कडून बाभळगाव येथे सुरु केलेल्या मोफत ब्यूटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालिताई विलासराव देशमुख यांची भेट

## प्रशिक्षणार्थी महिला भगिनीशी साधला संवाद

**लातूर/प्रतिनिधी** : विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने बाभळगाव येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी भेट दिली तसेच प्रशिक्षणार्थी महिला भगिणीसोबत संवाद साधला.

विलासराव देशमुख फाउंडेशनने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.ट्वेंटीवन ॲग्रीच्या संचलिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील महीलांना स्वयंरोजगार आणि स्वावलंबनासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

या अंतर्गत बाभळगाव येथे विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली असून या केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालिताई विलासराव देशमुख यांनी दि.२२ ऑगस्ट (शुक्रवार) रोजी सदिच्छा भेट दिली आणि या ठिकाणी प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिला भगिनीशी संवाद साधला व महिलांनी या प्रशिक्षणातून स्वतःच्या पायावर उभे रहावे व आपली आर्थिक प्रगती करून घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

ग्रामीण व शहरी भागात महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी असतात,या पार्श्वभूमीवर विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे.या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना पार्लर विषयीची प्राथमिक माहिती देऊन प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये वॅक्सिंग,विविध हेअर कट, मॅनिक्युअर,पेडिक्युअर, थ्रेडिंग, मेकअप,फेशियल याविषयी प्रशिक्षण दिले जात आहे.महिला भगिनींनी या प्रशिक्षणाबद्दल विलासराव देशमुख फाऊंडेशनचे आभार मानले.

यावेळी फाऊंडेशन च्या समन्वक संगीता मोळवणे गावचे उपसरपंच गोविंद देशमुख, मा उपसरपंच अविनाश



देशमुख,गावातील प्रमुख व्यक्ती, ट्रेनर शबाना शेख,गजानन बोयने,प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

# सलग दुसऱ्या दिवशी सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत मनपाची कारवाई

## ५५० किलो सिंगल युज प्लास्टिक जप्त

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या उपस्थितीमध्ये आज सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत शहरातील गंजगोलाई भागातील दोन गोडावुन मध्ये धडक कारवाई करून एकूण ५५० किलो (अंदाजे ८० हजार रूपये किंमतीचा प्लास्टिक साठा) जप्त करण्यात आला.

सदरील कारवाई मध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे, धोंडिबा सोनवणे, अक्रम शेख यांच्यासह अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

ही मोहीम अशीच सुरू राहणार असून आगामी सणासुदीच्या दिवसांमध्ये नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.



प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# वेलांकन्नी महोत्सव २०२५ साठी रेल्वे सोलापूर विभागातील ३ स्थानकांवरून मुंबई ते वेलांकन्नीदरम्यान ८ विशेष गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : भारतीय रेल्वेने वेलांकन्नी महोत्सव २०२५ मध्ये येणाऱ्या भाविकांसाठी सोलापूर विभागातील ३ स्थानकांवरून मुंबई ते वेलंकन्नी दरम्यान ८ विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

सेवांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एलटीटी मुंबई-वेलांकन्नी विशेष गाड्या (४ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०११६१ विशेष ट्रेन २६.०८.२०२५ रोजी दुपारी १ वाजता एलटीटी मुंबईहून निघेल आणि तिसऱ्या दिवशी दुपारी ३.०० वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल.
- ट्रेन क्रमांक ०११६२ विशेष ट्रेन २८.०८.२०२५ रोजी सकाळी ६.०० वाजता वेलांकन्नी येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल.
- ट्रेन क्रमांक ०११६३ ही विशेष गाडी ७.०९.२०२५ रोजी दुपारी १ वाजता एलटीटी मुंबईहून निघेल आणि तिसऱ्या दिवशी ०३.०० वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल.
- ट्रेन क्रमांक ०११६४ ही विशेष गाडी ९.०९.२०२५ रोजी सकाळी ६.०० वाजता वेलांकन्नी येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता एलटीटी मुंबईला पोहोचेल.

रचना: २ एसी-II टियर, ६ एसी-खखख टियर, १२ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ सेकंड सीटिंग कम गार्ड ब्रेक व्हॅन.

थांबे: ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, सोलापूर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अडोनी, गुंतकल, गुत्ती, तडिपतत्रि, यर्रगुंटला, कड़पा, राजमपेटा, रेणिगुंटा, काटपाडी, तिरुवण्णामलै, विल्लुपुरम, मयिलाड़तूरै और नागप्पट्टिनम.

वांद्रे टर्मिनस मुंबई - वेलांकन्नी स्पेशल (४ फेऱ्या)

- ट्रेन क्रमांक ०९०९३ स्पेशल वांद्रे टर्मिनस मुंबई येथून २६.०८.२०२५ आणि ०६.०९.२०२५ रोजी २०.४० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी ०७.४० वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल.
- ट्रेन क्रमांक ०९०९४ स्पेशल वेलांकन्नी येथून ३०.०८.२०२५ आणि ०९.०९.२०२५ रोजी ००.३० वाजता सुटेल आणि वांद्रे टर्मिनस मुंबईला दुसऱ्या दिवशी १०.३० वाजता पोहोचेल.

रचना: २ एसी-II टियर, ६ एसी-खखख टियर, १२ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ सेकंड सीटिंग कम गार्ड ब्रेक व्हॅन.

थांबे: बोरिवली, वसई रोड, पनवेल, लोणावळा, पुणे, दौंड, सोलापूर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अडोनी, गुंतकल, गुत्ती, तडिपतत्रि, यर्रगुंटला, कड़पा, राजमपेटा, रेणिगुंटा, काटपाडी, वेलूर छावनी, तिरुवण्णामलै, विल्लुपुरम, मयिलाड़तूरै और नागप्पट्टिनम.



आरक्षण आणि तिकिटे:

सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर विशेष शुल्कासह विशेष गाड्यांचे आरक्षण आधीच सुरू आहे. अनारक्षित डब्यांचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि UTS अ‍ॅपद्वारे देखील करता येते. गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांना वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे.

या विशेष ट्रेनच्या थांब्यांविषयी तपशीलवार माहितीसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा छढएड अ‍ॅप डाउनलोड करा. प्रवाशांना या विशेष ट्रेन सेवांचा लाभ घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

## सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांची मराठा समाजाच्या उपसमिती सदस्य पदी निवड



**अहमदपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांची मराठा समाजाची सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या मराठा समाजाच्या उपसमिती सदस्य पदी ना. बाबासाहेब पाटील यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती शासनाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.

त्या समितीचे अध्यक्ष म्हणून राधाकृष्ण विखे पाटील,तर सदस्य म्हणून ना. चंद्रकांत पाटील,ना. गिरीश महाजन ना. दादा भुसे, ना. उदय सामंत, ना. शंभूराज देसाई, ना. आशिष शेलार, ना. शिवेंद्रराजे भोसले, ना. माणिकराव कोकाटे,ना मकरंद पाटील व सामान्य प्रशासन विभागाचे सचिव आहेत.

ना. बाबासाहेब पाटील यांची मराठा समाजाच्या उपसमिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## साजरा पोळा ..

सर्जाराजा बोलले
आला पोळा सण
विनंती बळीराजा
एकऐकायची पण

नको पुरण पोळी
शिळीभाकर आण
काढूनको बा ऋण
आमची तुज आण

थकल्या पायी बा
नको हिंडू वण वण
खाऊसगळे मिळून
खूप होई कणकण

दुष्काळ नि महापूर
घाव घाले घण घण
सात बारा रक्ताळले
आश्वासनी तुणतुणं

नवेआणले तंत्रज्ञान
काम नुरे काही पण
निवांत बसे खोपटी
पोसतोमज तरीपण

घेशीकिती अनुदान
ओझे वाढे मणमण
अंधकार गरिबीचा
प्रकाश रे मिणमिण

ताईची हो सोयरिक
काहीपाडू नको उणं
लग्न होता आनंदाने
तोच असे खरा सण

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात बैलपोळा व मातृदिन कार्यक्रम उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी** : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात पाचवी ते सातवी विभागात कलोपासक मंडळांतर्गत आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी बैलपोळा व मातृदिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी बनवलेल्या बैलजोडी व सरस्वतीमाता यांच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, प्रमुख उपस्थिती केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव,मातापालक नंदिनी तावशीकर, स्वाती वडजे, रूपा चव्हाण यांची उपस्थिती होती.

यानंतर स्वाती वडजे यांनी मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की, भारत हा कृषिप्रधान देश आहे,बैल हा शेतकऱ्याचा महत्त्वाचा साथीदार असून त्याच्याबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजचा हा दिवस साजरा केला जातो तसेच आजच्या या मातृदिनाच्या शुभप्रसंगी गौतमीने युद्धप्रसंगी केलेला उपदेश गोष्टरुपात नंदिनी तावशीकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितला.अध्यक्षीय समारोपात बालासाहेब केंद्रे यांनी असे सांगितले की, आई ही संस्काराचे विद्यापीठ, चांगले-वाईट याची जाण करून देणारी, पहिली गुरु म्हणून भारतीय संस्कृतीत तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आई-वडील म्हणजे ३३ कोटी देव आहेत,ज्याच्याकडे आई-वडील आहेत तो व्यक्ती जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होय तसेच परिश्रमाचे प्रतीक असणाऱ्या बैलाचे महत्त्व सांगितले.

मातृदिनानिमित्त उपस्थित मातापालकांचे श्री विलास कुलकर्णी यांच्या मंत्रोच्चारात विद्यार्थ्यांनी मातृपूजन केले तसेच रिद्धी गिरे, भक्ती चोपले, विघ्नेश जोशी या विद्यार्थ्यांनी आई या विषयावर स्वरचित कवितांचे सादरीकरण केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत श्वेता अयाचित यांनी केले तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कांचन तोडकर यांनी केले आणि सृष्टी शृंगारे हिच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक अंजली निर्मळे,राम जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख मीरा चामवाड, कलोपासक मंडळ प्रमुख तेजस्विनी मुंडे , व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीतील चोरीच्या गुन्हयातील आरोपीला अटक

### ०३ गुन्हयांची उकल आरोपी कडून एकूण ०१,४५,७०० रुपयांचा मुद्देमाल

**लातूर/प्रतिनिधी** : याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस ठाणे गांधीचौक लातूर येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी पर्समधील रोख रक्कम ५७००/- रु कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरल्याची घटना घडली होती.धाराशिव जिल्ह्यात राहणारी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे गांधी चौक येथे गुरनं ३७०/२०२५ कलम ३०३ (२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार नराळे यांचे कडे देण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासात पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक करे पोलीस उप निरीक्षक गणेश चित्ते, म.पोउपनि श्रीमती पोवार, सफौ/राजेंद्र टेकाळे, पोलीस अंमलदार राम गवारे, रविसन जाधव, संतोष गिरी, शिवराज भाडुळे, सचिन चंद्रपाटले, नागनाथ नराळे, कृष्णा शेळके, सतिष डोंगरे, ज्ञानेश्वर गायकवाड, महिला पोलीस अंमलदार नंदा स्वामी यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करुन एका संशयीत महिला नामे १) महेक ऊर्फ अदिबा वय २० वर्ष रा. खाडगांव रोड लातूर. हिस ताब्यात घेवुन सदर महिलेला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर महिलेने गुन्हा केल्याचे कबुल करुन सदर गुन्हयातील गेला माल ५७००/- रु रोख रक्कम हस्तगत केली.

तसेच सदर महिलेस आणखी विश्वासात घेवुन विचारपुस करता सदर महिलेने पो स्टे गांधी चौक गुरनं २७९/२०२५ कलम ३०३ (२) बीएनएस गुन्हयातील गेला माल १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण व गुरनं २९५/२०२५ कलम ३०३ (२) बीएनएस मधील गेला माल एक ०५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असे चोरी केल्याची कबुली दिल्याने तीनही गुन्हयात चोरीस गेलेला एकुण ०१,४५,७००/- रु मुद्देमाल हस्तगत करुन तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत.





**मध्य रेल्वे**

**केटरिंग स्टॉल्सचा ई-लिलाव**

**लिलाव कॅटलॉग: SUR-C-TG-25-18**
**दिनांक:** २१.०८.२०२५ **लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ:** सुरू १२.०० दुपारी २८.०८.२०२५, बंद १३.४० दुपारी २८.०८.२०२५ **स्टेशन्सचे नाव** स्टेशन्सवरील चहाच्या स्टॉल्सच्या ई-लिलावासाठी ६० चौरस फूट क्षेत्रफळ दिले जाईल. १. मोहोल, २. दुधाणी, ३. माधा, ४. मॉडलिंब, ५. कुर्डुवाडी, ६. लातूर, ७. अराग, ८. भिगवान **मोड:** आयरेप्सद्वारे ई-लिलाव - ई-लिलाव (लीज मॉड्यूल) **निविदेचा कालावधी:** वार्षिक परवाना शुल्क आणि ५ वर्षे १०% वाढीसह चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे.

Apex-070 **डीआरएम(सी), मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है


# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य २६ ऑगस्ट रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर

**लातूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे हे मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ रोजी लातूर जिल्ह्यात दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

प्रा. डॉ. काळे यांच्या उपस्थितीत २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे १ ऑगस्ट २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत ओबीसी, एसबीसी, व्ही.जे., एनटी., एसईबीसी, ईडब्ल्यूएस या संवर्गातील वितरीत केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे यांचा आढावा, तसेच भटक्या विमुक्त आश्रमशाळांबाबत आढावा बैठक होईल. दुपारी १२.३० वाजता त्यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे लातूर जिल्हा भगीरथ गवंडी समाज या संघटनेचे व लोकप्रतिनिधींच्या निवेदनानुसार सगर/बेलदार जात समूहाचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधींशी चर्चा व सुनावणी होईल. दुपारी २ वाजता ते पुण्याकडे रवाना होतील.


**मध्य रेल्वे**

**निविदा सूचना अभियांत्रिकी काम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक:** 31-2025-SrDENS **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील डीडी-एसयूआर विभागात किमी ४३१/५-८ (युपी आणि डीएन) येथील पूल क्रमांक ४३१/१ आणि किमी ३१५/०-२ येथील पूल क्रमांक ३१५/१ च्या मार्गावर जीईओ सेल, जिओ टेक्सटाइल आणि ब्लँकेटिंग मटेरियल वापरून संक्रमण प्रणाली बसवणे. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ४,०६,१९,४७०.९३ **बयाणा रक्कम:** रु. ३,५३,१००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ०६ महिने **देखभाल कालावधी:** १२ महिने **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:** १२/०९/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: www.ireps.gov.in:** १२/०९/२०२५ रोजी १५.३० वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे याची नोंद घेता येईल. वेबसाइट: **www.ireps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य)**
Apex-072 **मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई- निविदा सूचना**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत:- **परिसरासह कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील आरआरआय सोलापूरमध्ये सामान्य शोध संकेत रिले/रिव्हर्स शोध संकेत रिले (एनकेआर/आरकेआर) सर्किटची तरतूद. **निविदा क्रमांक:** एसयूआर-एन-टी-२०२५-२६-१६ **कामाची अंदाजे किंमत:** रु. १,२९,६९,९७२.१७ **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य **जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. २,१४,९०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १५.०९.२०२५ रोजी १५.०० नंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

Apex-071 **डीआरएम एस अँड टी शाखा, सी.आर. सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**CENTRAL RAILWAY**

**क्रमांक एस. १२० टी . लिलाव कार्यक्रम/२०२५-२६ दिनांक १८.०८.२०२५**
मुख्य साहित्य व्यवस्थापक आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींचे वतीने **सप्टेंबर-२०२५** महिन्यात खालीलप्रमाणे भंगार विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित केले आहेत.

| लिलाव संचालक अधिकारी | लिलावाची तारीख आणि दिवस | | | संपर्क क्रमांक. |
|---|---|---|---|---|
| वरिष्ठ डीएमएम/एनजीपी | ०२.०९.२०२५ मंगळवार | १०.०९.२०२५ बुधवार | २२.०९.२०२५ सोमवार | ७२१९६१२७५० |
| एमएमआर डेपोसह सीनियर डीएमएम/बीएसएल. | ०३.०९.२०२५ बुधवार | ११.०९.२०२५ गुरूवार | २३.०९.२०२५ मंगळवार | ७२१९६११७५१ |
| वरिष्ठ डीएमएम/पीए | ०८.०९.२०२५ सोमवार | १५.०९.२०२५ सोमवार | २४.०९.२०२५ बुधवार | ७२१९६१३७५० |
| वरिष्ठ डीएमएम/बीबी | ०९.०९.२०२५ मंगळवार | १६.०९.२०२५ मंगळवार | २५.०९.२०२५ गुरूवार | ८८२८११९७५० |
| वरिष्ठ डीएमएम/एसयूआर | १०.०९.२०२५ बुधवार | १७.०९.२०२५ बुधवार | २६.०९.२०२५ शुक्रवार | ७२१९६१४७५० |
| एसएमएम(जी) सीआरडीसाठी डीवाय.सीएमएम[ईटीएल] मुख्यालय | ०२.०९.२०२५ मंगळवार | १०.०९.२०२५ बुधवार | २२.०९.२०२५ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय.सीएमएम(एम) पीआर | ०८.०९.२०२५ सोमवार | १५.०९.२०२५ सोमवार | २४.०९.२०२५ बुधवार | ८८२८११९७५५ |
| डीवाय.सीएमएम(सीडब्ल्यूई) एमटीएन | ०३.०९.२०२५ बुधवार | ११.०९.२०२५ गुरूवार | २३.०९.२०२५ मंगळवार | ८८२८११९७७० |
| एएमएम/एचबीएआर साठी डीवाय.सीएमएम[ईटीएल] मुख्यालय | ०२.०९.२०२५ मंगळवार | १०.०९.२०२५ बुधवार | २२.०९.२०२५ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय.सीएमएम [एसीएल] बीएसएल | ०९.०९.२०२५ मंगळवार | १६.०९.२०२५ मंगळवार | २५.०९.२०२५ गुरूवार | ७२१९६११७५० |

टीप: आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलाव केला जाईल. रेल्वे प्रशासनाला स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचा अधिकार आहे. **टीप: अ)** ई-लिलावातून कोणताही लॉट मागे घेण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही डेपो/विभागातील कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. तसेच कोणत्याही डेपो/विभागातील न विकलेले लॉट मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या नंतरच्या लिलावात विकले जाऊ शकतात. **ब)** सरकारच्या धोरणानुसार, जिथे भंगार साहित्याच्या पुनर्वापरात पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश असेल, तिथे अशा लॉट फक्त केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांनाच विकल्या जातील. **क)** ई-लिलाव कॅटलॉग **www.ireps.gov.in** वेबसाइटवर उपलब्ध असेल. **ड)** ई-लिलाव, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत कोणतीही मदत आवश्यक असल्यास, कृपया वरील संबंधित लिलाव संचालक अधिकाऱ्यांशी किंवा वरिष्ठ.सीएमएम/विक्री/मुख्यालय, मोबाईल क्रमांकावर संपर्क साधा. ८८२८११०७६१, ईमेल पत्ता **dycmm.s.cstm@gmail.com** - किंवा **dycmms@cr.railnet.gov.in**

Apex-383 **प्रिन्सिपल चीफ मटेरियल मॅनेजर**

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६